# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाज आज ही जातीय अत्याचाराचा बळी"

**डॉ. ॲड. दिनकर मारुती कबीर** कोल्हापूर मो. ८१४९७०८७५४.

---


- **सारांश:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात भारतात व महाराष्ट्रात ज्या पद्धतीने जातीय अत्याचार होत होते त्या पध्दतीने कमी जास्त प्रमाणात आजही जातीयवादी लोक त्रास देताना दिसून येतात. भारत स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्यानंतरच्या काळात आंबेडकरी सामाज्यावर हल्ले, अत्याचार, वर्णभेद, वर्णद्वेष, जातिवाद कमी होताना दिसून येत नाहीत. आज विविध ठिकाणी आंबेडकरी समाजाला टार्गेट केले जात आहे. नोकरीत, व्यवसायात, शिक्षणात व समाजात छुप्या पध्दतीने जातीय भेदभाव केला जातो. स्वातंत्र्यानंतर भारतात घडलेल्या हत्याकांडाच्या काही घटनांचा आढावा घेतला आहे. तर काही ठिकाणी विशिष्ट जातीचे असल्यामुळे पात्रता असूनही वशिला, पैसा व जात विचारात घेऊन नोकरीची संधी दिली जात नाही.


- **प्रस्तावना:**

भारतातील लोकसंख्या आर्य, द्रविड, मंगोलियन आणि शिथिअन या वंशांच्या मिश्रणाने बनलेली आहे. लोकांच्या वर्णामध्ये सुद्धा लक्षात घेण्याजोगा फरक आढळतो. जगातील इतर समाजाप्रमाणेच भारतीय समाजही सुरवातीच्या काळात अनेक वर्गानी मिळून बनलेला होता याची आपण आठवण ठेवली तर आपणास बराच लाभ होण्यासारखा आहे. भारतात प्राचीन काळी पुढील वर्ग होते. १) ब्राह्मण किंवा उपाध्याय वर्ग, २) क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग, ३) वैश्य किंवा व्यापारी वर्ग व ४) शूद्र किंवा शेतकरी व मजूरांचा वर्ग. ही वर्ग पद्धतीच होय, ही गोष्ट विशेषत्वाने लक्षात घ्यावयास हवी. हिंदुच्या इतिहास काळात केव्हातरी उपाध्याय वर्गाणी सामाजिक संबंधाच्या बाबतीत बाकीच्या जनतेपासून स्वतःला वेगळे तोडून घेतले. श्रम विभागणी तत्वानुसार बाकीच्या जनतेचीही विभागणी झाली. त्यामुळे काही वर्ग खूप मोठे तर काही अगदीच लहान झाले, वैश्य आणि शूद्रात जातीच्या मूळ रूपाचा बराच मसाला भरलेला होता. सैनिकी पेशा स्वभावतःच अशा पोट विभागणीस अनुकूल नसल्यामुळे क्षत्रिय वर्गाचे विभाजन राज्यकर्ते व सैनिक अशा दोनच भागात होऊ शकले. एका समाजाचे अशा तन्हेने पोटविभाग पडण्याची प्रक्रिया पूर्णतः स्वाभाविक आहे. परंतु या पोट विभागासंबंधीची अस्वाभाविक गोष्ट म्हणजे त्यांनी वर्गपद्धतीतील मुक्त प्रवेश पध्दती गमाविली आणि ते स्वयंमर्यादित वर्ग बनले. त्यांनाच जाती असे म्हणतात. प्रश्न असा की, प्रवेश बंद करून अंतर्गत विवाह करणारा वर्ग होण्यास त्यांना भाग पाडण्यात आले की त्यांनी स्वेच्छेनेच प्रवेशद्वार बंद केले?

- **जातीची निर्मिती: वर्णव्यवस्था :**

ब्राह्मणो अस्य मुखं असितम । बाहू राजन्यः कृतः ।
उरू तदस्य यद वैश्यः । पद्भ्याम शूद्रो अजायत ॥

ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील पुरुषसूक्तात विराट पुरुष स्वरूप वर्णन आले आहे.

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी ऋग्वेदाचे मराठी भाषांतर या ग्रंथात याबद्दल केलेले स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे- परमेश्वरनिर्मित विराट पुरुष कसा जन्मला? त्याचे मुख, हस्त, जंघा आणि पाद कोणते होते? ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे लोक विराट पुरुषाचे मुख, बाहू, जंघा यापासून आणि शूद्र लोक त्याच्या पायापासून उत्पन्न झाले. चातुर्वर्ण्यनिर्देश अशी सुरुवातीलाच टीप देऊन ते स्पष्टीकरण करतात. १२ व्या ऋचेमध्ये ब्राह्मण, राजन्य (क्षत्रिय), वैश्य आणि शूद्र लोकसमूहांचा निर्देश असला, तरी त्यास तेथे वर्ण म्हटलेले नाही.

आर्यांचे भारतावरील पहिले आक्रमण इसवी सन पूर्व सुमारे १७५० मध्ये झाले. आर्यांची दुसरी लाट इसवीसन पूर्व ११०० मध्ये आली. आर्यांची समाजव्यवस्था रानटी-लुटारी स्वरूपाची होती. त्यावेळी त्यांच्यात वर्णव्यवस्था नव्हती. अशा या लुटारू टोळयांचा सिंधुजनांनी सुरुवातीच्या काळात अनेक वेळा पराभव केला. पण वेगवान अश्वरथ व लोखंडी शस्त्रे यांच्या साह्याने आकस्मिक हल्ले, लुटालूट या तंत्राने सिंधुजनांवर त्यांनी हळूहळू विजय मिळविला. विजय प्रवास सुरू झाल्यानंतर त्यांना नवीन वसाहतींची गरज भासू लागली. शेती उत्पादनाचे ज्ञान आवश्यक बनले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्णव्यवस्था जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांचा सखोल अभ्यास करून याबद्दलच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचा पाया निर्माण केला. वर्णव्यवस्थेच्या निर्मितीचे त्यांनी समाजशास्त्रीय संशोधन केले. शूद्र पूर्वी कोण होते? या ग्रंथात डॉ. आंबेडकर म्हणतात-

- सूर्यवंशाच्या ज्या जमाती होत्या, त्यांतील एका जमातीचे आर्य लोक होते.
- क्षत्रिय वर्ण असा शूद्रांचा हिंदी आर्य समाजात दर्जा होता.
- एक काळ असा होता की, आर्यसमाज फक्त तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य मानीत होता. तेव्हा शूद्र हा स्वतंत्र वर्ण समजला जात नव्हता, तर उपभाग समजण्यात येत होता.
- शूद्र राजे आणि ब्राह्मण लोक यांच्यामध्ये एकसारखे झगडे चालू असत.

- यज्ञोपवीत वापरण्याचा हक्क नष्ट झाल्यामुळे शूद्रांचे समाजातील स्थान वैश्यांच्या खालच्या दर्जाचे झाले. त्यामुळे चौथा शूद्र वर्ण अस्तित्वात आला.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी वैदिक साहित्यातील शूद्र राजांची माहिती दिली आहे, त्याचप्रमाणे ब्राह्मण-शूद्र संघर्षाचे उदाहरणासहित वर्णन केले आहे. असेच ब्राह्मणवर्ण आणि क्षत्रिय राजे यांच्या संघर्षाचे उदाहरणासहित वर्णन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे. संस्कारसिंचनाचा हक्क व मक्तेदारी ब्राह्मणवर्णाकडे होती. ज्या ठिकाणी सिंधु समाजाची कृषक राजसत्ता होती, तेथे शूद्र वर्ण नव्हता. हे पुरावे डॉ आंबेडकर यांच्या संस्कारसिंचन व यज्ञोपवीताचा हक्क नष्ट केल्यामुळे शूद्रवर्णाची निर्मिती झाली या मताला पुष्टी देणारे आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि दासगण असलेले सारे शूद्र अशी चातुर्वर्ण्यव्यवस्था निर्माण करून त्यानुसार वैदिक आर्यांनी आपल्या वसाहतींची निर्मिती केली. याबद्दल शरद पाटील 'जात्यन्तक क्रान्ती व समाजवादी पूर्ती' या पुस्तकात म्हणतात "पितृसत्ताक पशुपालक आर्यजमातींनी भारतात अनार्य वैराज्ये व गणदासप्रथाक मातृवंशक राजके यांच्याशी उच्छेदक संघर्ष करून चातुर्वर्ण्याधिष्ठित गणशूद्रप्रथाक राजके उभारली." हे दोन्ही प्रवाह, अब्राह्मणी व ब्राह्मणी, सबंध भारतीय इतिहासभर जोडीने वाहत गेले आहेत. झगडत, परस्परांवर प्रभाव पाडीत व विधायक नकार क्रिया करीत. या वर्णसंघर्षावर वि. का. राजवाडे यांनी 'राधा माधव विलास चंपू' या पुस्तकात स्पष्ट प्रकाश टाकला आहे. 'चातुर्वर्ण्याचा इतिहास म्हणजे त्यातील स्त्रिया व शूद्र यांचा इतिहास प्रामुख्ये करून आहे.

जात हा शब्द कसा आला याचा खुलासा वि. का. राजवाडे यांनी त्यांच्या 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या पुस्तकात केला आहे. "जनी म्हणजे जन्म देणारी स्त्री, जन म्हणजे जन्म देणारा पुरुष आणि अशा स्त्री-पुरुषापासून जन्मलेले ते जात. जात म्हणजे जन्मलेले मूल. कालांतराने विशिष्ट स्त्री पुरुषापासून जन्मलेले मूल, ती त्याची त्याच्या आई-वडिलांकडून आलेली जात, असा अर्थ रूढ झाला'. गावाच्या गरजेप्रमाणे जातींच्या संख्येत वाढ झाली आणि जातिव्यवस्थेनुरूप बलुतेदार, आलुतेदार निर्माण झाले.

**बलुतेदार-** १) लोहार २) सुतार ३) महार ४) मांग ५) कुंभार ६)चांभार ७) परीट ८) न्हावी १०) गुरव ११) मुलाणा १२) कोळी
**आलुतेदार** - १) तेली २) तांबोळी ३) साळी ५) जंगम ६) कळवंत ७) डौया ८) ठाकर ९) घडशी १०) तराळ ११) सोनार १२) चौगुला.

कामाच्या स्वरूपाप्रमाणे आणि गरजेप्रमाणे बारा बलुतेदारांपैकी काही स्पृश्य तर काही अस्पृश्य ठरले.

विदेशी संशोधकांनी जातींची वैशिष्ट्ये आणि व्याख्या सांगितल्या. त्यांचे समालोचन डॉ. आंबेडकरांनी 'हिंदूची जातिप्रथा व ती मोडण्याचा मार्ग' या ग्रंथात केले आहे. सेनार्ट, नेसफिल्ड, सर एच. रिस्ले या विदेशी संशोधकांनी केलेल्या जातींच्या व्याख्यांमधील कमतरता डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केली आहे. डॉ. केतकर या भारतीय संशोधकाने केलेली जातीची व्याख्या वास्तवाच्या अधिक जवळ जाणारी आहे. जातिबाह्य विवाहबंदी व जातीत जन्मलेल्यांनाच सदस्यत्व, अशी जातीची व्याख्या करताना केतकरांनी दोन मुद्दे मांडले आहेत. पण दोन्ही मुद्दे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले आणि जात्यंतर्गत विवाह हेच जातीचे व्यवच्छेदक लक्षण ठरते असा त्यांनी निष्कर्ष काढला आहे. (१) विवाहबंधन (२) रोटीबंधन (३) व्यवसायबंधन (४) जातपंचायत (५) श्रेणीबद्धता व जातवार अलग वस्ती (६) आनुवंशिकता अशी जातिव्यवस्थेची सहा लक्षणे डॉ. आंबेडकरांनी सांगितली आहेत.

- **व्याख्या:**

१) मि. नेफिल्ड जातीची व्याख्यापुढील प्रमाणे करतोः "जात हा असा एक लोकसमूह असतो की त्याचा इतर लोकसमूहाशी लग्न व खाणे पिणे याबाबतीत परस्पर संबंध मुळीच नसतो. या समूहान तील व्यक्ती केवळ अंतर्गत गटातील व्यक्तींपुरतेच वरील प्रकारचे संबंध मर्यादित ठेवतात."

२) डॉ. केतकरांच्या मते "जात ही एक सामाजिक संस्था असून तिची वैशिष्टये दोन आहेत. १) जातीचे सभासदत्व केवळ जातीत जन्माला आलेल्यापुरतेच मर्यादित असते. आणि त्या जातीत जन्माला आलेल्या सर्वांचा तिच्यात समावेश होतो. २) काठोर जात कायद्यान्वये जातीतील व्यक्तींना जातीबाहेर लग्न करण्यास मनाई करण्यात आलेली असते."

- **संशोधन पद्धती:**

या संशोधन पत्रात भारतामध्ये जातीव्यवस्था, अस्पृश्यता अशी निर्माण झाली. ब्रिटीश राजवटीने अस्पृश्यांना कशी मदत केली. भारत स्वातंत्र्यानंतर दलित समाज्यावर किती व कसे अन्याय, अत्याचार झालेत. तसेच आजदेखील होत आहेत. याचा विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक अभ्यास केला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोत प्रामुख्याने- पुस्तके, जर्नल्स, वर्तमानपत्र, टीव्ही न्यूज, युटूब वरील माहिती आणि वेबसाइट्स इत्यादींचा वापर केला आहे.

- **उद्दिष्ट्ये:**

1. ब्रिटीश राजवटीत अस्पृश्यांचा फायदा आणि भारत स्वतंत्र्यानंतर जातीय हत्याकांड याचा अभ्यास.
2. भारतातील जातीव्यवस्थेचे आजचे (जातीवादाचे) बदललेले गंभीर स्वरूप.

- **ब्रिटिश राजवटीतील अस्पृश्यता निवारणासाठीचे काम:**

ब्रिटीश राजवट अस्पृश्यांना वैयक्तिक तसेच सामाजिक दृष्ट्या फायदेशीर ठरली.हिंदू धर्मियांमधील विटाळाच्या भावनेमुळे अस्पृश्यांना कुठेच वाव नव्हता. ब्रिटीश राजवटीत मात्र अस्पृश्यांना डोके वर काढण्यास संधी मिळाली. त्या संधीचा फायदा घेऊन अस्पृश्यांना सोनं केले. अस्पृश्यांनी आपल्या अंगी असलेला पराक्रम व बुद्धिमता किती वरच्या दर्जाची आहे ते सिद्ध करुण दाखविले. कोकण प्रातांतील कित्येक अस्पृश्य लोक सुभेदार, जामदार, हवालदार, हेडमास्तर व क्लार्क यासारख्या जबाबदारीच्या पदावर पोहोचले. अस्पृश्य वर्गाच्या ब्रिटीश लष्करातील नोकरीमुळे हिंदू समाजरचनेत एकप्रकारची करणाती झाली. ज्या महार-चांभार लोकांना गावात मराठे वगैरे लोक शिवत नव्हते व ज्यांनी जोहर किंवा राम राम केला नाही तर मराठे लोक आपला अपमान झाला असे असजत, तेच मराठा शिपाई महार व चांभार सुभेदारास वाकून सलाम देत व त्यांच्या नजरेला नजर भिडविण्याची यांची हिंमत होत नसे.

लष्करात नव्याने भरती झालेल्यांनाही रात्रीच्या शाळेत जाण्याची सक्ती करण्यात आली होती. लष्करी मुलामुलींसाठी दिवसाच्या शाळा असत व त्यांच्या प्रौढ नातलगांसाठीही रात्रीच्या शाळा असत. अशा शाळेतून डॉ. आंबेडकरांचे वडिल रामजी सपकाळ यांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली होती. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोबा मालोजी सपकाळ सेवानिवृत्त लष्करी शिपाई होते. त्यांची ४ ही मुले ब्रिटिशांच्या लष्करी सेवेत होती.

महात्मा जोतिबा फुलेंनी महाराष्ट्रात सर्वप्रथम अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. अस्पृश्यांच्या वस्तीत शाळा सुरु केली. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुण दिले. म. फुले यांच्या तालमीत तयार झालेल्या कार्यकर्त्यांमध्ये गोपालबाबा आद्य व प्रमुख होते. गोपाळबाबांनी हिंदू धर्मग्रंथांचा बारकाईने अभ्यास केलेला होता. या धर्मग्रंथामुळेच अस्पृश्यांना किती अमानुषपणे वागविले व त्यांचे माणूसपण हिरावून घेतले याची त्यांना जाणीव झाली होती. प्रस्थापित धर्मग्रंथाच्या तटबंदीला सुरुंग लावावा, दीनदलितांचे दु:ख वेशीवर टांगावे या उद्देशाने त्यांनी 'दीनबंधु', 'सुधारक' या साप्ताहीकांमधून अत्यंत प्रखर व प्रभावी असे लिखाण केले व अस्पृश्यांचे प्रश्न, त्यांचे दु:ख वेशीवर टांगण्याचे काम केले.

**महार सैनिकांची कामगिरी:** काळपुरुषाने या युद्धाचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहून काढला. महार सैनिकांनी पेशव्यांचा दणदणीत पराभव केला. तोही अल्पशा सैनिक बळावर पेशव्यांच्या प्रचंड सैन्याला सामोरे जात. महार सैनिकांनी नवा इतिहास रचला. पेशव्यांच्या ३०,०००० सैनिकांचा फक्त ५०० महार सैनिकांनी धुव्वा उडविला. या युद्धामुळे महार सैनिकांच्या शौर्याचा डंका चारही दिशांना वाजू लागला. साऱ्या जगाला महार सैनिकांच्या पराक्रमाची ओळख झाली. महार सैनिकांमुळेच इंग्रज विजयी झाले असा संदेश जगभर गेला. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी महार सैनिकांच्या पराक्रमाची दाखल घेत कोरेगाव येथील भीमा नदीच्या काठी त्यांच्या शौर्य स्मृतीचे प्रतीक (महारवीरांच्या विजयाचे प्रतीक) म्हणून विजयस्तंभ १८८२ साली उभारला. त्यावर त्यांच्या शौर्याच्या प्रित्यर्थ खालील ओळी लिहल्या आहेत.

"One of the proudest trinphs of the British Army in the east"

- **जातिव्यवस्थेचे भयानक रुप: जातीय हत्याकांड:** (ह्युमन राईटस वॉचच्या अहवालानुसार – एप्रिल २०२३)

भारतातील १६५ दशलक्ष लोकांशी अमानुष आणि अपमानास्पद वागणूक जातीच्या आधारावर दिली जाते. अस्पृश्यांवर जमीन धरण करणाऱ्या समुदायाकडून होणाऱ्या अत्याचारांबद्दल उद्धृत करताना लेखक डॉ.सी.पी. यादव म्हणतात की, "गावत आणि छोट्या शहरांमध्ये अस्पृश्यांवर अत्याचार केले जातात आणि अशा घटनांमध्ये वाढ होत आहे.

1. १९४८ मध्ये ब्राह्मणविरोधी दंगली महाराष्ट्रात चित्पावन ब्राह्मण असलेल्या नथुराम गोडसे ने म. गांधींची हत्या केल्यानंतर, ब्राह्मणांना मराठा जातीतील लोकांनी लक्ष्य केले.
2. १९५७ मध्ये रामनाथ दंगल तामिळनाडूमध्ये हा हिंसाचार फॉरवर्ड ब्लॉकला पाठींबा देणारे थेवर आणि काँग्रेस समर्थक दलित पल्लर यांच्यात मद्रास विधानसभेच्या निवडणुकीनंतर झालेल्या पोटनिवडणुकीमुळे दंगलीत ४२ दलित मारले गेले.
3. तामिळनाडू किल्वेनमणी १९६८ मध्ये खेडेगावातील मजुर जास्त वेतनासाठी संपावर होते, जमीनदारांनी पाठवलेल्या टोळीने ४४ दलितांची हत्या केली होती.
4. १९७८ विल्लुपुरम तामिळनाडू येथे हिंसाचारात १२ दलित मारले गेले आणि १०० हून अधिक दलितांची घरे दलित वस्तीत जाळली गेली.
5. उत्तर प्रदेश १९८१ बेहमई फुलन देवी ही एक भारतीय डाकू होती, पारंपारिक मल्लाह कुटुंबात जन्मलेल्या, तिचे लुटारुंच्या टोळीच्या गुज्जर म्होरक्याने तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला, पण उपनेते विक्रम ने तिला संरक्षण दिले, नंतर विक्रमाच्या उच्चवर्णीय ठाकूर मित्राने त्याची हत्या केली, फुलनाचे अपहरण करुन तिला बेहमई गावात कोंडून ठेऊन ठाकूर पुरुषांनी बलात्कार केला. फुलनने पळून जाऊन स्वतःच्या मल्लांची एक टोळी तयार करुन सतरा महिन्यांनी, फुलन तिचा बदला घेण्यासाठी गावात परतली. १४ फेब्रुवारी १९८१ रोजी तीच्या टोळीने गावातील २२ ठाकूर पुरुषांची हत्या केली, त्यापैकी फक्त दोन जण तीच्या अपहरण किंव्हा बलात्कारात सामील होते. फुलन देवी यांनी नंतर आत्मसमर्पण केले आणि अकरा वर्षे तुरुंगवास भोगला, त्यानंतर ती राजकारणी बनली. त्या दोनदा खासदार म्हणून निवडून आल्या आणि त्यांनी दलित आणि आदिवासींच्या हक्कांसाठी लढा दिला. २५ जुलै २००१ रोजी शेरसिंग राणा यांनी बेहमई हत्याकांडाचा बदला घेणेसाठी फुलन देवी यांची गोळ्या झाडून हत्या केली.
6. करमचेडू आंध्रप्रदेश १७ जुलै १९८५ रोजी हे हत्याकांड कम्मा जातीच्या लोकांनी माडिगा जातीतील दलितांची हत्या केली.

7. १९८७ बिहार दलेलचक भगौरा येथे राजपूत समाजातील ५२ उच्च जातीच्या सदस्यांची हत्या माओवादी कम्युनिस्ट सेंटर, यादवांच्या नेतृत्वाखालील डाव्या मिलिशियाने आयोजित केली होती.
8. आंध्र प्रदेश राज्यातील गुंटूर जिल्ह्यातील नीरुकोंडा गावात १५ जुलै १९८७ रोजी कम्मा जातीच्या सदस्यांनी बनलेल्या संतप्त जमावाने दलित मालांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. दंगलखोरांनी पाच लोकांना ठार मारले ज्यात चार माला होते..
9. आंध्र प्रदेश त्सुंदूर ६ ऑगस्ट १९९१ रोजी ८ दलितांच्या हत्येमुळे हे गाव कुप्रसिद्ध झाले, रेड्डी आणि तेलगा यांचा समावेश असलेल्या ३०० हून अधिक लोकांच्या जमावाने सिंचन कालव्याच्या बंधाऱ्याजवळ पीडितांचा पाठलाग केला.
10. बिहार बारा दि. १२-१३ फेब्रुवारी १९९२ च्या मध्यरात्री, माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर ऑफ इंडिया, आता भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) ने बिहारच्या गया जिल्ह्याजवळील बारा गावात भूमिहार जातीच्या ३५ सदस्यांची निर्घृण हत्या केली.
11. बिहार बथनी टोला, भोजपूर दि. ११ जुलै १९९६ रोजी येथे रणवीर सेनेने २१ दलितांची हत्या केली. मृतांमध्ये ११ महिला, ६ मुले आणि ३ अर्भकांचा समावेश आहे.
12. बिहारमध्ये १९९४ छोटान शुक्ला खून हा भूमिहार समाजाचा गुंड होता, ब्रिज बिहारी प्रसाद या सरकारच्या मंत्री जो बनिया जातीचा त्यांची हत्या केली होती.
13. तामिळनाडू, मदुराई जिल्ह्यातील मेलावलावू गावात १९९७ मध्ये ग्राम परिषदेच्या अध्यक्षपदासाठी एका दलिताच्या निवडीनंतर, हिंदू (कल्लर) जातीच्या गटाच्या सदस्यांनी सहा दलितांची हत्या केली.
14. बिहार गया लक्ष्मणपूर बाठे दि. १ डिसेंबर १९९७ रोजी, रणवीर सेनेने लक्ष्मणपूर बाथे, जेहानाबाद येथे ५८ दलितांना गोळ्या घालून ठार केले.
15. रमाबाईनगर हत्याकांड मुंबई, दि. ११ जुलै १९९७ रोजी रमाबाईनगरच्या दलित वसाहतीत डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या पुतळ्याची अज्ञात व्यक्तींनी विटंबना केली होती. सुरुवातीला शांततापूर्ण निषेधावर पोलिसांनी गोळीबार केला, ज्यामध्ये १० लोक ठार झाले. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याने २६ जण जखमी झाले.
16. उत्तर प्रदेश सेनारी १९९९ मध्ये यादव आणि दुसध यांचे वर्चस्व असलेल्या माओवादी अतिरेकी केंद्राने जहानाबाद जवळील सेनारी गावात ३४ भूमिहारांची कत्तल केली.
17. पंजाब भुंगार खेरा १९९९ मध्ये अबोहरमधील भुंगार खेरा गावातील ग्रामपंचायतीच्या चार सदस्यांनी रामवती देवी या अपंग दलित महिलेला गावात नग्नावस्थेत नेले.

- **२१ वे शतक व जातीय अत्याचार -**

1. बिहार अफसर २००० ही घटना उच्चवर्णीय भूमिहार आणि मागास जाती कुर्मी यांच्यातील वर्चस्वासाठीच्या वैराचा परिणाम होती. १२ भूमिहारांच्या हत्येने भूमिहार तरुणांमध्ये संतापाची लाट उसळली.
2. कर्नाटक राज्यातील कोलार जिल्ह्यातील कंबलपल्ली दि. ११ मार्च २००० रोजी येथे एका उच्चवर्णीय रेड्डी जमावाने ७ दलितांना घरात कोंडून जिवंत जाळले.
3. बिहार जहानाबाद तुरुंगावर छापा २००५ मध्ये, भूमिहारांची संख्या जास्त आहे, तेथे दोन तासांहून अधिक काळ माओवाद्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या संपूर्ण शहराला प्रचंड हल्ले आणि वेढा घातला गेला. कोरी आणि तेली सारख्या जातीतील गरीब शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली निम्न जातीच्या शेतमजुरांच्या सुमारे २०० सशस्त्र पुरुषांनी जिल्हा कारागृहावर हल्ला केला.
4. महाराष्ट्र खैरलांजी हत्याकांड दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी मराठा कुणबी जातीतील ४० लोकांच्या जमावाने महार समाजातील भोतमांगे कुटुंबातील चार जणांची हत्या केली होती. महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी या छोट्याशा गावात ही घटना घडली. महार हे दलित, तर कुणबींना भारत सरकारने इतर मागास वर्ग म्हणून वर्गीकृत केले आहे. भोतमांगे यांना नग्न करून ४० लोकांच्या जमावाने गावाच्या चौकात नेले. मुलांना त्यांच्या आई आणि बहिणीवर बलात्कार करण्याचा आदेश देण्यात आला आणि त्यांनी नकार दिल्यावर त्यांची हत्या करण्यापूर्वी त्यांचे गुप्तांग विकृत करण्यात आले.
5. महाराष्ट्रात २००६ मध्ये, कानपूर- उत्तर प्रदेश येथे आंबेडकरांच्या पुतळ्याच्या तोडफोडीमुळे महाराष्ट्रात दलितांनी हिंसक निदर्शने केली. हिंसक निदर्शनांदरम्यान, दलित आंदोलकांनी ३ गाड्या पेटवल्या, १०० हून अधिक बसेसचे नुकसान केले आणि पोलिसांशी चकमक झाली किमान ४ मृत्यू आणि अनेक जखमी झाले.
6. पंजाब बंत सिंग दि. ५ जानेवारी २००६ च्या संध्याकाळी, एक मझाबी शीख, यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. पाच वर्षांपूर्वी पंजाबमध्ये त्यांच्या गावातील उच्चवर्णीय सदस्यांनी सामूहिक बलात्कार केलेल्या त्यांच्या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी सक्रियपणे काम केल्याचा बदला म्हणून हे घडले, असा त्यांचा आरोप आहे.
7. राजस्थानमध्ये गुर्जर प्रांतात, १९९९- २००२ दरम्यान, दलितांविरुद्धच्या गुन्ह्यांची सरासरी वर्षाला ५०२४ नोंद आहे, ४६ हत्या आणि १३८ बलात्काराच्या घटना आहेत.
8. राजस्थान २००९ मध्ये सुमन बलाई या विद्यार्थिनीवर तीन राजपूत लोकांनी त्यांच्या गावातील विद्यार्थिनीला बळजबरीने कोरड्या विहिरीत नेऊन सामूहिक बलात्कार केला.

9. हरियाणा मिर्चपूर दलित हत्याकांड २०१० मध्ये, दलितांच्या वाल्मिकी समुदायाच्या वसाहतीत, जाट समाजातील १० ते १५ मद्यधुंद मुलांवर २ वर्षांचा कुत्रा कथितपणे भुंकला. राजिंदर पाली या जाट मुलाने कुत्र्यावर वीट फेकली, त्यामुळे एका तरुण दलिताने आक्षेप घेतला. नंतर वीर भान आणि करण सिंह नावाच्या दोन वाल्मिकी वडिलांनी जाट वडिलांची माफी मागितली पण त्यांना मारहाण झाली.

10.तामिळनाडू धर्मपुरी जिल्ह्यातील डिसेंबर २०१२ मध्ये नाईकनकोट्टई जवळील आदि द्रविड समाजातील दलितांची सुमारे २६८ घरे, झोपड्या, टाइलचे छप्पर आणि एक किंवा दोन खोल्यांची काँक्रीट घरे - उच्च जातीच्या वन्नियार यांनी जाळली.

11.अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई गावात २०१३ मध्ये सवर्ण मराठा जातीच्या मुलीशी प्रेमप्रकरण केल्यामुळे सचिन घारू व त्याचे २ मित्र संदीप व राहुल यांना मुलीचे वडिल, भाऊ आणि चुलत्यांनी घरी बोलावून हत्या केली.

12.तामिळनाडू मारक्कनम जवळील ईस्ट कोस्ट रोडवरील गावकरी आणि मामल्लापुरम २०१३ मध्ये, वान्नियार प्रबळ जातीच्या मेळाव्याला जात असलेल्या लोकांमध्ये हिंसाचार झाला.

13.राजस्थानच्या नागौर जिल्ह्यातील डंगवास गावात दि. १४ मे २०१५ रोजी जाट आणि दलितांमध्ये झालेल्या दलित हिंसाचार संघर्षात ४ लोक ठार आणि १३ जखमी झाले.

14.दि. १८ जानेवारी २०१६ रोजी हैदराबाद रोहित वेमुलाच्या आत्महत्येनंतर सेंट्रल युनिव्हर्सिटीच्या रोहित वेमुला यांच्या आत्महत्येने संपूर्ण भारतातून निषेध आणि संताप निर्माण झाला.

15.तामिळनाडू अरियालूर जिल्ह्यातील किझामलीगई गावात डिसेंबर २०१६ मध्ये, एका १७ वर्षीय अल्पवयीन दलित मुलीवर हिंदू मुन्नानी केंद्रीय सचिव व तीन साथीदारांनी सामूहिक बलात्कार करुन तिची हत्या केली. तिच्या गर्भातून गर्भ बाहेर काढला.

16.राजस्थानात २०१७ मध्ये आनंदपाल सिंगचा खून हा जाट आणि राजपूत यांच्यातील वर्चस्वासाठीच्या लढाईचा परिणामांचा कळस होता.

17.उत्तर प्रदेश २०१७ मध्ये सहारनपूर राजा महाराणा प्रताप यांच्या मिरवणुकीत मोठ्या आवाजातील संगीतावरून ठाकूर आणि दलितांमध्ये हिंसाचार झाला. या हिंसाचारात एकाचा मृत्यू झाला, १६ जण जखमी झाले आणि २५ दलितांची घरे जाळण्यात आली.

18.राजस्थानच्या जोधपूर जिल्ह्यातील दि. १४ जानेवारी २०१८ रोजी संध्याकाळी समरौ गावात जाट आणि राजपूत यांच्यात झालेल्या संघर्षात अनेक निष्पाप लोकांची दुकाने आणि घरे जाळली आणि रावला उद्ध्वस्त केले.

19.महाराष्ट्र २०१८ भीमा कोरेगाव हिंसाचार, पुणे भीमा कोरेगावच्या लढाईच्या विजयाच्या २०० व्या वर्धापन दिनानिमित्त भीमा कोरेगाव येथे वार्षिक उत्सवाच्या मेळाव्यादरम्यान हा कार्यक्रम पाहुण्यांवर हल्ला होता. नंतर, फोरम फॉर इंटिग्रेटेड नॅशनल सिक्युरिटी (FINS) नावाच्या थिंक टँकने, ज्यात प्रामुख्याने निवृत्त लष्करी अधिकारी होते, भीमा कोरेगाव दंगलीवर एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात हिंदू नेते मिलिंद एकबोटे आणि संभाजी भिडे यांना थेट सहभागातून मुक्त करण्यात आले आहे.

20.भारतात एप्रिल २०१८ च्या सुरुवातीस, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाखो लोकांनी अ‍ॅट्रॉसिटी कायद्यावरील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात संपूर्ण भारतभर निषेध दरम्यान हिंसाचारात १४ लोकांचा मृत्यू झाला व शेकडो जखमी झाले.

21.तामिळनाडू कचनाथम मंदिराची घटना दि. २८ मे २०१८ रोजी, दलितांनी उच्च-वर्णीय कुटुंबाला मंदिराचा सन्मान न दिल्याने वर्चस्व-जातीतील हिंदू "क्रोधित" झाले आणि एक दलित माणूस उच्च-वर्णीय पुरुषांसमोर पाय रोवून बसला. स्थानिक पोलिसांसोबत प्रत्युत्तर म्हणून १५ वर्चस्व असलेल्या जातीच्या सदस्यांच्या टोळीने रात्रीच्या वेळी दलित गावात हल्ले केले, तीन जणांना बेशुद्ध करून ठार केले, ६ जण जखमी झाले.

22.महाराष्ट्र, मुंबई दि. २२ मे २०१९ रोजी, पायल तडवी या २६ वर्षीय अनुसूचित जमातीच्या स्त्रीरोगतज्ज्ञ यांनी मुंबईत आत्महत्या केली. तिच्या मृत्यूपर्यंत अनेक महिने, तिने तिच्या कुटुंबियांना सांगितले होते की ३उच्च जातीच्या महिला डॉक्टरांनी तिच्यावर रॅगिंग केले होते.

23.उत्तर प्रदेश, हाथरस जिल्हामध्ये सप्टेंबर २०२० मध्ये एका दलित मुलीवर गावातील ४ ठाकूरांनी सामूहिक बलात्कार केला आणि पुरावे नष्ट करण्यासाठी तिच्या पाठीचा कणा मोडला आणि गुन्हेगारांनी जीभ कापली. हॉस्पिटलमध्ये चित्रित केलेल्या व्हिडिओमध्ये मुलीने याची कबुली दिली आहे. पोलिसांनी शवविच्छेदन चाचणी न करता मध्यरात्री गुप्तपणे तिचा मृतदेह जाळला.

24.राजस्थान जालोर जिल्हा, २०२२ मध्ये इंद्र मेघवाल नावाच्या ९ वर्षांच्या दलित मुलाला पिण्याच्या पाण्याच्या भांड्याला स्पर्श केल्यामुळे एका शिक्षकाने मारहाण केली, ज्यामुळे २४ दिवसांनी त्याचा मृत्यू झाला.

25.राजस्थान बिकानेर जिल्हा, २०२३ मध्ये २० वर्षीय दलित महिलेवर ३ उच्चवर्णीय पुरुष आणि २ पोलिस कर्मचाऱ्यांनी सामूहिक बलात्कार करून तिची हत्या केली, जेव्हा ती संगणक वर्गात जाण्यासाठी जात होती.

26.नांदेड जिल्हा, महाराष्ट्र २०२३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केल्याबद्दल अक्षय भालेराव या २४ वर्षीय दलित व्यक्तीला ७ सवर्णांनी मारहाण करून ठार मारले. पीडितेचा भाऊ आकाश यालाही मारहाण करण्यात आली.

27.हिमाचल प्रदेश, चंबा जिल्हा, २०२३ मध्ये शरीफ मोहम्मद याने मुस्लिम महिलेशी प्रेमसंबंध ठेवल्याच्या आरोपावरून २२ वर्षांच्या मनोहर लाल या दलित पुरुषाची निर्घृणपणे हत्या करून मृतदेहाचे ८ तुकडे केले.

28.उत्तर प्रदेश, बुडौन जिल्हा, २०२३ मध्ये जमिनीच्या वादातून एका १० वर्षीय मुलाची आणि गुरजीत नावाच्या तिसऱ्या वर्गातील विद्यार्थ्याची सवर्णांच्या गटाने हत्या केली. गुरजीत मालमत्तेच्या वादग्रस्त भागाजवळ खेळताना आढळल्याने उच्चवर्णीय लोकांनी गळा दाबून त्याची हत्या केली.

29.राजस्थान, जोधपूर जिल्हा, २०२३ जय नारायण व्यास युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये एका अल्पवयीन दलित मुलीवर तिच्या १७ वर्षीय प्रियकरासमोर ३ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हल्ला केला आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. हे तिन्ही महाविद्यालयीन विद्यार्थी RSS विद्यार्थी शाखा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) चे भाग होते आणि घटनेच्या काही तासांनंतर त्यांना अटक करण्यात आली.

30.महाराष्ट्रात २०२४ मध्ये भिवंडीत शुल्लक वादातून शिवसेना (शिंदे गट) उपशहरप्रमुख कैलास धोत्रे त्याचा मुलगा व इतर साथीदारांनी संकेत भोसले या अल्पवयीन युवकाचे अपहरण करुन त्यास बेदम मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला.

- **आजच्या परिस्थितीमध्ये होणारा जातिवाद:**

कोणत्याही क्षेत्रात काम करताना अस्पृश्यता निवारण कायदा अंतर्गत एस.सी. व एस. टी. ला ॲट्रॉसिटी नुसार कायदेशीर कारवाई करता येते. मात्र अनेक केसेस मध्ये ॲट्रॉसिटी नुसार गुन्हे नोंद केले जात नाहीत. काही ठिकाणी तर राजकीय वचक, पोलिस यंत्रणा यामुळे न्याय मिळणे दूर उलट ज्यांचे शोषण झालेले आहे, त्यांच्यावर चोरी, लुटमारी इ.चे गुन्हे दाखल केले जातात. गावातील उच्च जातीचे सर्व पुढारी व पोलिस यंत्रणा एकत्र येऊन शोषित-पिढीत लोकांवर दबाव आणून गुन्हेगारांना सोडून देतात.

मागासवर्गीय समाजातील विशेषत: एस.सी. (महार व काही ठिकाणी मातंग) यांना कामाच्या ठिकाणी अतोनात त्रास दिला जातो. जर काम करणारा व्यक्ती आंबेडकर विचाराचा असेल तर मात्र त्याला अफाट त्रास दिला जातो.

1. कामाच्या ठिकाणी माहिती घेत असताना त्यांना नाव, शिक्षण, अनुभव, पत्ता इत्यादि विचारले नंतर हळूच आपली जात विचारली जाते. काही ठिकाणी उमेदवार आपण एस.सी. असलेचे सांगतो. तर उलट त्याला "एस.सी. म्हणजे नेमके तुम्ही कुणाचे?" "तुम्ही आंबेडकर चळवळीत काम करता का?" असे अनेक प्रश्न विचारले जातात. आणि त्यांना कामावर न घेता नंतर कळवितो असे सांगतात.
2. उच्च जातीचे लोक काही लोक आज उघडपणे जातीय बोलत नाहीत पण अप्रत्यक्षपणे छुपा जातीयवाद करताना दिसून येते.
3. एस.सी असेल तर काही ठिकाणी नोकरी दिली जात नाही, भाड्याने घर दिले जात नाही.
4. गाव व शहरी पातळीवर मागासवर्गीय समाजातील व्यक्तींना टोचून बोलले जाते.
5. एका कॉलेजने महापूरात काही कुटुंबाना मदत केली. पण त्या कॉलेजच्या मा. चेअरमन यांनी "सर्व मदत ही महार-मांगांना गेली, काही उपयोग झाला नाही." असे त्यांनी अनेकवेळा अनेकाजवळ बोलून दाखविले.
6. उच्च जातीच्या काही लोकांनी छ. शिवाजी महाराज, म. फुले, छ. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचलेले आहेत, काही लोक छुपा जातिवाद करताना दिसून येतात. तर काही लोक जातीय विचार न करता एकात्मता, समानता तत्वानुसार काम करताना दिसतात.
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव फक्त जयंतीनिमित्त घेताना दिसतात. तर काहीजण उलट तुमच्या आंबेडकर यांचे आज काही तरी आहे ना. असे बोलतात.
8. काही लोक, शाळा, संस्था, कॉलेज, हे आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वाचतो, त्यांना मानतो असे खोटे, नाटे सांगतात. त्यांच्याबरोबर चर्चा केली तर लक्षात येते की हे सर्व दाखविण्यासाठी करतात. आम्ही जातीवादी नाही हे दाखविण्यासाठी खटाटोप म्हणून जयंती, महानिर्वाण दिन, व्याख्याने, चर्चासत्र आयोजित करतात..

- **निष्कर्ष:**

1. आज देखील उच्च जातीच्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना व त्यांच्या समाज्याला मनापासून जवळ केलेले नाही. काही लोक याला अपवाद देखील आहेत पण त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.
2. मागासवर्गीय समाजातील लोकांना आज योग्यतेचे काम मिळत नाही. पात्रता असून देखील कामाची संधी दिली जात नाही. तर संधी असेल तर एस.सी. मधील न बोलणारा, गुलाम म्हणून काम करत राहणारा, मानसिक गुलामी पत्करणारा व्यक्ती कामावर घेतला जातो.
3. आज अनेक ठिकाणी आंबेडकरी समाज बाहेर फेकला गेला आहे. उच्च शिक्षण घेऊन या समाजातील लोक व्यवस्थेमुळे त्रासदायक जीवन जगात असलेचे दिसून येते.
4. उच्च जातीच्या समाजातील महिला-पुरुष जातीय टिप्पणी करताना दिसून येतात. उदा. कापड दुकानात कपडे घेताना निळा रंग असलेले कपडे दाखविले तर लगेच या जातीवादी लोकांना/महिलांना त्रास होतो.
5. काही ठिकाणी कांबळे नावाचे कामगार चालत नाहीत. किती जातीय वितुष्ट रुजले. आहे.
6. आंबेडकरी समाज ज्या ज्या ठिकाणी काम करतो त्या त्या ठिकाणी त्याला या सर्व पातळीवर जातीचे चटके कमी-जास्त प्रमाणात बसलेले आहेत.
7. आंबेडकरी समाज आपल्या घरात, गाडीवर, मोबाईलवर, फोटो, अशोकचक्र, झेंडा असेल तर त्यांचा द्वेष केला जातो.

8. आंबेडकरी समाज संविधानुसार लोकशाही वाचावी म्हणून प्रयत्न करतो.
9. उच्च जातीचे काही प्रमाणातील लोक हे १००% बदललेले आहेत. ही बाब महत्वाची आहे. जातिवाद मानणारे जादा आहेत. पण आता सुरवात झालेली आहे. उच्च जातीचे लोक बदलत आहेत. ही आनंदाची बाब आहे.

- **समारोप:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्व भारतीयांनी आत्मसात करणे गरजेचे आहे. उच्च जातीच्या लोकांनी बाबासाहेब ही वाचले पाहिजेत, भारताचे संविधान वाचले पाहिजे, आपले अधिकार जाणून घेतले पाहिजेत. आपल्या हकाक्साठी लढले पाहिजे, संविधान वाचविले पाहिजे, संविधान राहिले तर आपण स्वाभिमानी, लोकशाही, समता, न्याय, बंधुता, प्रेमाने राहू शकतो. तसेच भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना आपले मानून जवळ घेतले तरच भारत महासत्ता होईल.

- **संदर्भग्रंथ:**

1. वैदिक संस्कृतीचा विकास – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
2. हिंदूची जातिप्रथा व ती मोडण्याचा मार्ग – डॉ. आंबेडकर
3. शूद्र पूर्वी कोण होते? – डॉ. आंबेडकर
4. जातिप्रथेचे विध्वंसन – डॉ. आंबेडकर
5. दास-शूद्रांची गुलामगिरी – शरद पाटील
6. जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व – शरद पाटील
7. जात्यन्तक भांडवलवादी लोकशाही क्रांती – शरद पाटील
8. पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास – डॉ. सुमन्त मुरंजन
9. वैदिक धर्म आणि बहुजनांची गुलामगिरी – आ.ह. साळुंखे
10. भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास – वि.का. राजवाडे
11. बळीवंश – आ. ह. साळुंखे
12. मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद – शरद पाटील
13. जातिव्यवस्था, निर्मिती आणि स्वरूप, प्रा.वसंत वाघमारे, पोखरापूर, ता.मोहोळ, जि. सोलापूर
14. सी.एम.बागडे, भीमा कोरेगावचे युध्द अर्थात इतिहासाचे सोनेरी पान, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
15. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अस्पृश्य मुळचे कोण?, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन.
16. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांती आणि प्रतिक्रांति, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन.
17. डॉ. सी. एच. निकुंभे, आद्य अस्पृश्योद्धारक गोपाळबाबा वलंगकर, सुगावा प्रकाशन, पुणे.
18. भारत पाटणकर, जातिव्यवस्थेचा अंत, श्रमिक मुक्ती दल प्रकाशन, कासेगाव.
19. महात्मा फुले, शेतकऱ्याचा असूड, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
20. महात्मा फुले, गुलामगिरी, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
21. डॉ. आ. ह. साळुंखे, महात्मा फुले आणि धर्म, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
22. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ब्राह्मणी साहित्य, सुगावा प्रकाशन, पुणे.
23. सोनई तिहेरी हत्याकांड: एकाच कुटुंबातले ६ दोषी, BBC News. २०१८/०३/२०
24. भारतातील अस्पृश्य विरुद्ध छुपा वर्णभेद जातीय भेदभाव, ह्युमन राइट्स वॉच, १२/०२/२००७.
25. सी.पी यादव (२०००), अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा विश्वकोश, खंड २. शाश्वत विकास संस्था. p 490. ISBN 9788126106554.
26. एन.पी.(२०१८), द अनटोल्ड वाजपेयी: राजकारणी आणि विरोधाभास. रँडम हाऊस इंडिया.
27. मरियम डोसल; रुबी मालोन, एड्स.(१९९९), राज्य हस्तक्षेप आणि लोकप्रिय प्रतिसाद: एकोणिसाव्या शतकात पश्चिम भारत. लोकप्रिय प्रकाशन. p 11. ISBN 9788171548552.
28. मॉरीन पॅटरसन (१९८८), डोनाल्ड डब्ल्य; मिल्टन इस्रायल; नरेंद्र के. वागळे (सं.). महाराष्ट्रातील शहर, ग्रामीण भाग आणि समाज, टोरंटो विद्यापीठ, दक्षिण आशियाई अभ्यास केंद्र. पृ.३५-५८.
29. रिमेम्बरिंग इमॅन्युएल सेकरन: शूर दलित नेता ज्याने सवर्ण क्रूरतेत जीव गमावला, २०१६.
30. राजसेकरन, इलांगोवन (२०१८), मुदुकुलथुरच्या आठवणी. फ्रंटलाइन.
31. जॉन अर्क्विला (२०११), बंडखोर, हल्लेखोर आणि डाकू, रोवमन आणि लिटलफिल्ड.
32. बालगोपाल, के. (१९९१), पोस्ट-चांदूर आणि इतर चुंदुर, आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक.
33. शौमोजित (२०१२), बठाणीच्या रहिवाशांसाठी, ते विसरू शकत नाहीत ही एक भयानक गोष्ट आहे. हिंदू. चेन्नई, भारत.
34. बॅनर्जी, शौमोजित (२०१२),बिहार दलित हत्याकांडातील सर्व आरोपी निर्दोष, हिंदू चेन्नई.
35. बथनी टोला प्रकरण: बिहार सरकार निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाईल, हिंदू. चेन्नई, भारत. 18/०४/२०१२.

36.गुप्ता स्मिता, पिन केलेले लिंच, आउट लुक. पीटीआय ७ जून २००७.
37.तुटलेले लोक, भारतातील, अस्पृश्य विरुद्ध जाती हिंसा, ह्युमन राइट्स वॉच, ०१/०३/१९९९.
38.स्मिता नरुला; ह्युमन राइट्स वॉच (संस्था) तुटलेले लोक: भारतातील, अस्पृश्य विरुद्ध जाती हिंसा. ह्युमन राइट्स वॉच. २२ एप्रिल २०१२.
39.कुमार, अश्वनी (२००८), समुदाय योद्धा: बिहारमधील राज्य, शेतकरी आणि जातीचे सैन्य, लंडन, न्यूयॉर्क: अँथम प्रेस.
40.नितीशचा विक्रम मोडीत निघाला, हिंदुस्तान टाइम्स २३ मे २००६.
41.सिन्हा, ए. (२०११), नितीश कुमार आणि बिहारचा उदय. ISBN ९७८-०-६७०-०८४५९-३.
42.डॉ. बी. आर. आंबेडकर, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (पृ. 11-101) भारत: वर्सो.
43.करात, बी. (२०१६), खैरलांजी, तेव्हा आणि आता. २ जून २०१७ रोजी इंडियन एक्स्प्रेस.
44.मेनन, मीना (२०१४) गुन्हेगाराला सक्षम करणे, हिंदू.
45.खैरलांजी ते कानपूर . इंडियन एक्सप्रेस १४ डिसेंबर २००६.
46.सुभमान जगतात, भारतातील दलित, Indiatogether.org. २६ जून २०१४.
47.उमा चक्रवर्ती, एड.(२०१७), फॉल्ट लाइन्स ऑफ हिस्ट्री: द इंडिया पेपर्स II. दक्षिण आशियातील लैंगिक हिंसा आणि दोषमुक्तीवर झुबान मालिका. झुबान. p 175.
48.मिर्चपूर: एक कुत्र्याची गोष्ट, मासिक, १ मे २०१०.
49.कुत्र्याच्या भुंकाने मिर्चपूर दलित हत्येची घटना, टाइम्स ऑफ इंडिया, २६ ऑगस्ट २०१८.
50.सिंग, अदिती (२०१८), अनुसूचित जातींवरील अत्याचार कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत, मिर्चपूर प्रकरणावर दिल्ली उच्च न्यायालय, बार आणि खंडपीठ, २६ ऑगस्ट २०१८.
51.आर. अरिवनंतम (२०१२). धर्मपुरीमध्ये 3 दलित वसाहतींना जमावाच्या रोषाचा सामना करावा लागला, हिंदू.
52.नंदिनी बलात्कार आणि हत्या: तमिळनाडूमध्ये गुंतागुंतीचे जात, धर्माचे राजकारण सुरू आहे, हिंदुस्तान टाइम्स, १ एप्रिल २०१७.
53.सेल्वराज, ए. (२०१७), दलित मुलीच्या बलात्कार-हत्येचा संताप, टाइम्स ऑफ इंडिया.
54.गँगरेप करून विहिरीत टाकले: अरियालूरमध्ये दलित मुलीच्या हत्येप्रकरणी चौघांना अटक . द न्यूज मिनिट, २४ जानेवारी २०१७.
55.सहारनपूर: मोठ्या आवाजावर ठाकूर आणि दलितांमध्ये हाणामारी, २५ घरे जाळली, १ ठार" . डीएनए २२ मे २०१७.
56.विवेक भावसार, भीमा-कोरेगाव हिंसाचार: RSS-संबंधित समितीने पोलिसांच्या उदासीनतेला दोष दिला, फ्री प्रेस जर्नल, ३ मार्च २०१८.
57.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने सर्वात खालच्या जातीचा निषेध म्हणून भारतातील संताप, न्यूयॉर्क टाइम्स असोसिए टेड प्रेस. २ एप्रिल २०१८.
58.तडवीच्या मृत्यूनंतरही, डॉक्टरांचे शरीर जातिभेदाबद्दल अविश्वासू, द वायर. ९ ऑगस्ट २०१९.
59.सुरेश, निधी (२०२०), ग्राउंड रिपोर्ट: यूपीच्या हाथरसमध्ये दलित मुलीवर हल्ला, जखमींचा मृत्यू, न्यूज लॉन्ड्री २ ऑक्टोबर २०२०.
60.राजस्थान शाळेतील शिक्षकाच्या मारहाणीत दलित मुलाचा मृत्यू, हिंदू. १४ ऑगस्ट २०२२.
61.आंबेडकर जयंती साजरी केल्याबद्दल दलित व्यक्तीची हत्या, इंडिया टुडे, ४ जून २०२३.
62.दिनेश बोथरा (२०२३), जोधपूर येथील युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये प्रेयसीसमोर दलित मुलीवर तिघांनी सामूहिक बलात्कार केला, हिंदुस्तान टाइम्स २७ जुलै २०२३.